# कर्मवीर वाघ विद्याभवनच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**सकाळ वृत्तसेवा**

निफाड, ता. २९ : कर्मवीर काकासाहेब वाघ संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त भाऊसाहेबनगरच्या माजी विद्यार्थ्यांचा स्मृतिगंध मेळावा ३ नोव्हेंबरला होणार आहे. त्यानिमित्त माजी विद्यार्थ्यांच्या आठवणींना उजाळा देणारे विविध कार्यक्रम होणार असल्याची माहिती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी भाऊसाहेबनगर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

श्री. वाघ यांनी १९७० मध्ये वाघ शिक्षण संस्थेची स्थापना केली. क. का. वाघ विद्याभवनच्या रूपाने ही संस्था स्थापन झाल्यानंतर आज संस्थेच्या ३५ वेगवेगळ्या शाखा कार्यरत आहेत. अभियांत्रिकी, कृषी, परिचारिका, ललित, कला आदी क्षेत्रांत वाघ संस्थेने नावलौकिक मिळवला आहे. संस्थेचे अनेक माजी विद्यार्थी देश-परदेशात विविध पदे भूषवत आहेत. सुवर्ण महोत्सवानिमित्त संस्थेतर्फे रस्ता सुरक्षा अभियान, महिला दिन, वृक्षारोपण, योग दिन, रक्तदान शिबिर, वाचन प्रेरणा दिन आदी कार्यक्रम होणार आहेत. वर्षभरात भव्य शेतकरी मेळावा, विज्ञान प्रदर्शन, अभियांत्रिकी महाविद्यालय आणि पदविका महाविद्यालय, माजी विद्यार्थी मेळावा, कृषी व कर्मयोगी पुरस्कार आदी कार्यक्रम होणार आहेत. क. का. वाघ विद्याभवन, भाऊसाहेबनगर, गीताई वाघ कन्या विद्यालय, भाऊसाहेबनगर, क. का. वाघ विद्यालय (पिंपळस) या संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा ३ नोव्हेंबरला सकाळी आठ ते सायंकाळी पाच यादरम्यान होणार आहे.

भाऊसाहेबनगर येथे होणाऱ्या या मेळाव्यास २२ हजार विद्यार्थ्यांपैकी अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्री. वाघ यांनी केले. मेळाव्यात निवृत्त शिक्षक, दिवंगत शिक्षकांच्या कुटुंबीयांचा सत्कार होणार आहे. माजी विद्यार्थ्यांनी स्मृतिगंध मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन श्री. वाघ यांनी केले. पत्रकार परिषदेस अजिंक्य वाघ, प्राचार्य मनोज झाडे, प्राचार्य एस. बी. गाडे, मुख्याध्यापक सी. पी. कुशारे, मुख्याध्यापिका जयश्री पानगव्हाणे, अधीक्षक श्रीकांत ढवळे, एस. एस. अहिरे, आर. के. संधान आदी उपस्थित होते.